# कागदाचा चेंडू

कागदाचे 20 षटकोन घेऊन तुम्हाला कागदाचा चेंडू बनवता येईल.



1. एक षटकोन घ्या आणि त्याच्या एक सोडून एक टोकांची मध्याकडे घडी घाला. घड्या मजबूत करून त्या मध्यभागाशी काटकोन करून सरळ उभ्या राहतील असे पहा. आणखी चार षटकोन घेऊन असेच करा.




2. दोन उभ्या त्रिकोणांच्या बाहेरच्या बाजूला डिंक लावून त्यांना एकत्र चिकटवा.




3. त्याचप्रमाणे तिसरा षटकोनही पहिल्या दोघांना चिकटवा.




4. आणखी दोन षटकोनही चिकटवा. पाचवा षटकोन पहिल्याला चिकटवला जाईल...



5. आणि पाच त्रिकोणी बाजू असलेली आणि मध्यावर उभ्या घड्या असलेली एक आकृती तयार होईल.



20 भाग असलेला चेंडू तयार!

6. आता राहिलेले दहा षटकोन ओळीने चिकटवा. क्रमांक 3 मध्ये दाखविल्याप्रमाणे पहिले तीन षटकोन जोडायचे आहेत हे लक्षात ठेवा, पण चौथा मात्र वेगळ्या ठिकाणी चिकटवायचा आहे. या साखळीच्या दोन्ही टोकांना डिंक लावून चिकटवा. मग वरचा आणि खालचा भाग डिंकाने चिकटवलात, की झाला तुमचा चेंडू तयार!